**नि.दि.दावा <u>क्र. ७४/२०१४</u>**
**<u>नि.क्र. ३७ पुढे</u>**

**निशाणी ३८ वरील आदेशाप्रमाणे <u>वादी तर्फे साक्षीदार क्रमांक १— किसन गांजवे यांचा शपथेवर उलटतपास प्रतिवादीतर्फे ॲड. ओ. व्ही. भरींडवाल यांच्या मार्फत सुरु:</u>—**

१९. मी इयत्ता १० पर्यंत शिकलो आहे. मी कृषीविदयापीठ राहुरी येथे सन १९६४ ते १९९८ पर्यंत नोकरीला होतो. हे म्हणणे खरे आहे की, सन १९९८ मध्ये निवृत्त झाल्यानंतर मी खालची पेठ इगतपूरी येथे राहत आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी हे टाकेद बुद्रुक येथे रहिवासी असून तेथेच राहुन शेती करतात. हे म्हणणे खरे आहे की, कुळ कायदयाच्या जमिनीचा व्यवहार करण्यापूर्वी सरकारकडून त्याची परवानगी घ्यावी लागते. मी दावा मिळकतीचे सन १९५० पासूनचे रिकॉर्ड पाहिलेले नाही. मी दावा मिळकती वर कोणकोणती बंधने आहे याबाबत चौकशी केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकती ही नवीन अविभाज्य शर्तीची आहे. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीच्या कबुला संदर्भात कोणती माहिती घेतलेली नाही. हे मला माहित नाही की, जिल्हाधिकाऱ्याची परवानगी घेतल्याशिवाय दावा मिळकतीचा कब्जा घेता येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, इगतपुरीच्या कचेरीमध्ये सर्व टाइपिस्ट बसता व तेथेच दुय्यम निबंधकाचे कार्यालय आहे. हे म्हणणे खरे आहे की, अनंत पांडुरंग जोशी यांना मी ओळखतो व कोंडीराम साबळे हे माझे साडु लागतात.

२०. हे मला माहित नाही की, प्रतिवादीच्या वडीलांना सन १९८६ मध्ये कर्करोग झालेला होता. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे प्रतिवादीची परिस्थिती हालाखीची होती व त्यांना पैशाची गरज होती. हे म्हणणे खरे

नाही की, त्यावेळी प्रतिवादी यांनी माझ्याकडे येऊन रु. ५०००/— ची मागणी केली. हे म्हणणे खरे नाही की, मी त्यांना सांगितले की सदर रकमेवर ३ टक्के व्याज लागेल आणि त्यांना मुद्रांक आणायला सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. २नी दि. २१/३/१९८६ रोजी मला रु. ७ व ३ चे कोरे मुद्रांक आणून दिले. हे म्हणणे खरे नाही की, ३ रुपयांच्या कोऱ्या मुद्रांकावर प्रतिवादीच्या सहया घेतल्या. हे मला माहित नाही की, सन १९८७—८८ मध्ये प्रतिवादीचे वडिल कर्करोगाने मृत्यु पावले. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर प्रतिवादी माझ्या कडे आले त्यांनी रु. ५०००/— व्याजासह परत केले आणि कोऱ्या मुद्रांकांची मागणी केली. हे म्हणणे खरे नाही की, कोरे स्टॅम्प मी नष्ट करुन टाकले असे प्रतिवादीना सांगितले.

२१. हे म्हणणे खरे आहे की, मी सन २००७ मध्ये प्रतिवादीना ॲडव्होकेट बी. एन. वाजे यांच्या मार्फत साठेखतावरुन खरेदीखत करुन देण्याकरिता नोटीस पाठवली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर प्रतिवादी मला भेटले व नोटीस का पाठवली अशी विचारणा केली. हे म्हणणे खरे नाही की, मी सदर नोटीस अनाधनाने पाठवली असे त्यांना सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, सन १९८६ ते २००७ या कालावधीत माझी प्रतिवादीशी भेट झाली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, सन २००७ ते २०१४ या कालावधीत माझी प्रतिवादी सोबत भेट झाली नाही.

२२. हे म्हणणे खरे आहे की, तलाठी प्रत्येक वर्षी जमिनीमध्ये कोणी पीक लावले याची चौकशी करुन नोंद घेता. हे म्हणणे खरे आहे की, माझे व टाकेद बुद्रुक या गावच्या तलाठी यांचे कोणतेही वाद नाही. हे म्हणणे खरे आहे की, सन १९८६ पासुन दावा मिळकतीच्या मालक कब्जेदार व पीक पाहनी सदरी प्रतिवादी यांची नावे दाखल आहे. हे म्हणणे

खरे आहे की, सन २०१२ मध्ये मी तलाठी यांच्याकडे पीक पाहणी सदरी माझे नाव लावावे असा अर्ज केला होता. हे म्हणणे खरे आहे की, तहसिलदारांनी जागेवर येवनू चौकशी करुन दावा मिळकतीमध्ये माझा कब्जा नाही हे पाहून माझा अर्ज फेटाळला. हे म्हणणे खरे आहे की, मी सदर प्रकरणाच्या आदेशाविरुध्द वरिष्ठ न्यायालयात कोणतेही अपील केले नाही. हे म्हणणे खरे आहे की, सन २०१२ नंतर आजपर्यंत पीक पाहणी सदरी माझे नाव लावावे याकरिता कोणताही अर्ज मी केला नाही.

२३. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादीना सन २००७ मध्ये नोटीस दिल्यानंतर त्यांनी दावा मिळकतीचे खरेदीखत करुन दिले नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी खरेदीखत करुन देणार नाही ही बाब सन २००७ साली मला माहित झाली होती. हे म्हणणे खरे आहे की, दि २०/९/२००७ ते २०/९/२०१० या कालावधीत मी खरेदीखत करुन मिळण्याकरिता प्रतिवादी विरुध्द कोणत्याही न्यायालयात दावा केला नाही. हे म्हणणे खरे आहे की, सन २०११ मध्ये प्रतिवादीच्या कुटुंबामध्ये दावा मिळकतीचे वाटप झाले आहे. हे म्हणणे खरे आहे की, सन २०११ ते २०१४ या कालावधीत मी प्रतिवादी विरुध्द कोणताही दावा दाखल केला नाही. हे म्हणणे खरे आहे की, सन २०१२ सालच्या पीक पाहणीच्या केस नंतर माझे प्रतिवादीशी कोणताही संपर्क झालेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, दि. २९/१/२०१४ रोजी कोणतीही घटना घडली नाही.

२४. मी प्रतिवादीनी दिलेली कैफीयत वाचलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, सन १९८६ ते २०१४ या कालावधीमध्ये दावा मिळकतीचे खरेदी परवानगी मिळण्याकरिता जिल्हाधिकाऱ्याकडे अर्ज दाखल झालेला नाही. तसा अर्ज २८/६/१९९५ रोजी केला आहे. हे म्हणणे खरे आहे की, परवानगीचा अर्ज केल्याबाबतचा उल्लेख दाव्यामध्ये केलेला नाही. हे

म्हणणे खरे आहे की, त्या अर्जाची नक्कल मी प्रस्तुत दाव्यामध्ये दाखल केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या मध्ये कोणताही खरेदीचा व्यवहार ठरला नसल्यामुळे तसा परवानगीचा अर्ज कोणत्याही जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, परवानगीचा अर्ज २८/६/१९९५ रोजी केला होता हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, २१/३/१९८६ ते २०/९/२००७ या कालावधीत मी प्रतिवादी कडे कोणतीही मागणी व चौकशी केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी दि. २१/३/१९८६ रोजी दावा मिळकतीचा साठेखत करारनामा रक्कम रु. ६५००/— देऊन करुन दिला हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, साक्षीदारासमक्ष व्यवहारांची बोलणी झाली, व्यवहाराची रक्कम रु. ६५००/— ठरली व साक्षीदारासमक्ष व्यवहार झाला हे मी खोटे सांगत आहे.

२५. हे म्हणणे खरे नाही की, दि. २१/३/१९८६ रोजी प्रतिवादीनी आम्हाला दावा मिळकती विक्री करण्याचे व त्याकरिता परवानगी आणण्याचे प्रतिवादीने कबुल केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीच्या पश्चिम दक्षिण पट्टयातील जमिनीचा कब्जा प्रतिवादीनी मला दिला हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझा दावा मिळकतीमध्ये कोणत्याही प्रकारे कब्जा नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी दावा मिळकतीचे काल्पनिक वर्णन केले व काल्पनिक चतु:सिमा लिहिल्या आहे. हे म्हणणे खरे नाही की, आनंद जोशी हे माझे मित्र असल्यामुळे मी कोऱ्या मुद्रांकांवर खोटा साठेखत करारनामा तयार केला व साक्षीदारांच्या खोटया सहया केल्या. हे म्हणणे खरे नाही की, सन १९८६ पासून २०१४ पर्यंत खरेदीखत करुन मिळण्याकरिता मी कोणतीही तयारी व तत्परता दाखवलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी व माझ्या मध्ये निम्मा

निम्मा खर्च करुन खरेदीखत करायचे असे ठरले नाही. हे मला माहित नाही की, प्रतिवादीनी सन २०११ मध्ये मिळकतीची मोजणी व पोटहिस्सा करुन घेतलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी प्रतिवादीना कोणकोणत्या तारखांना भेटलो यांचा तपशील दाव्यामध्ये दिलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी दावा मिळकतीमध्ये बांधबंदिस्त व सपाटीकरण केल्याचा कोणताही पुरावा दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी दावा मिळकतीमध्ये झाप बांधलेला नाही व कधीही पिके घेतलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी टाकेद या गावी कधीही जात नाही व माझा दावा मिळकतीशी संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी दाव्यामध्ये व प्रतिज्ञापत्रामध्ये खोटा मजकुर नमुद केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृती,

सही/—

स्थळः—इगतपुरी ( मो. द. ननवरे )

दिनांक ०७.०८.२०२६ दिवाणी न्यायाधीश व.स्तर, इगतपुरी.